**आजी/माजी सैनिकांच्या पत्नींच्या आंतरजिल्हा बदलीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

शासन पुरकपत्र क्रमांक. आंजिब- ४९१९/प्र.क्र.२१९/आस्था-१४

२५ मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,मुंबई ४००००१

दिनांक : ७ ऑगस्ट, २०१९

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांक आंजिब ४९१७/प्र.क्र. ७९/आस्था-१४, दि. २४ एप्रिल, २०१७.

२) शासन निर्णय क्रमांक आंजिब - ४९१९/प्र.क्र. २१९/आस्था-१४, दिनांक ८ मार्च, २०१९.

३) शासन पुरकपत्र क्रमांक आंजिब - ४९१९/प्र.क्र. २१९/आस्था-१४, दिनांक १५ जुन, २०१९.

४) शासन शुध्दीपत्रक क्र. आंजिब - ४९१९/प्र.क्र. २१९/आस्था-१४, दिनांक १७ जुन, २०१९.

**शासन पूरकपत्र :-**

आजी/माजी सैनिकांच्या पत्नींच्या आंतरजिल्हा बदलीसंदर्भात दिनांक ८.३.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला होता. तसेच सदर शासन निर्णय निर्गमीत झाल्यानंतर जिल्हा परिषदेतील काही आजी सैनिकांच्या पत्नींच्या आंतरजिल्हा बदलीसंदर्भात दिनांक १५.६.२०१९ रोजी शासन पूरकपत्र निर्गमीत करण्यात आले होते. तथापि, काही आजी/माजी सैनिकांच्या पत्नी ज्या जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षिका या पदावर कार्यरत आहेत, त्यांच्या बदल्या झाल्या नसल्याचे वा त्यांची नावे संदर्भ क्र.२ व ३ येथील अनुक्रमे दिनांक ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयामध्ये व दिनांक १५ जून, २०१९ च्या शासन पूरकपत्रामध्ये समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार आजी / माजी सैनिक पत्नींची नावे वरील संदर्भ क्र.२ येथील दिनांक ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णय व संदर्भ क्र.३ येथील दिनांक १५ जून, २०१९ शासन पूरकपत्राच्या परिशिष्टामध्ये समाविष्ट करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून, या परिशिष्टात अनुक्रमांक ३६ नंतर खालील नावे त्यात समाविष्ट करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | नांव | आडनाव | सद्य:स्थितीचा जिल्हा | पसंतीचा जिल्हा | बदली झाली आहे किंवा कसे | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| ३७ | शारदा | चव्हाण | रत्नागिरी | लातूर | नाही | वि.जा. (अ) |
| ३८ | कविता | कुंदे | रत्नागिरी | अहमदनगर | नाही | भ.ज.(ड) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३९ | नम्रता | राऊत | यवतमाळ | नागपूर | नाही | खुला |
| ४० | अर्चना | काकडे | यवतमाळ | नागपूर | नाही | खुला |

या सर्व शिक्षकांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्ह्यात तात्काळ बदली करण्यात यावी व त्यांना आजच कार्यमुक्त करुन, बदली झालेल्या जिल्हा परिषदेत हजर होण्याचे आदेश देण्यात यावेत. तसेच संबंधितांच्या बदलीबाबत व पदस्थापनेबाबत संदर्भ क्रमांक २ येथील मूळ शासन निर्णय दिनांक ८ मार्च, २०१९ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती कायम आहेत.

सदर शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक. 201908071306355220 असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2019.08.07 15:59:00 +05'30'

**( प्रि.शं.कांबळे )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
८) सर्व विभागीय आयुक्त
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

१०) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
११) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
१२) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग,
१३) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास विभाग, मुंबई-३२